क्र.जिपव/प्राशिवि/खाप्राशा/अनु/ वशि- ५८६ /२०१८
कार्यालय, शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जि.प.वर्धा.
दिनांक :- २५/५/२०१८

प्रति,

**अध्यक्ष / सचिव,**
**पोदार लिटरसी अ‍ॅण्ड एज्युकेशन ट्रस्ट,**
**मुंबई**

**विषय :- महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम, २०१२ अंतर्गत स्वंयअर्थसहाय्यीत तत्वावर नवीन शाळा स्थापन करणे,तसेच विद्यमान शाळेचा दर्जावाढ करण्यासाठी २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरीता परवानगी प्रदान केल्याने शाळेची प्रथम खाते मान्यतेकरीता शाळेची तपासणी करणेबाबत.**

संदर्भ :- १) महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम (महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण क्र.१,६व २४)२०१२
२) महाराष्ट्र शासनाचे शालेय शिक्षण व क्रिडा विभाग,यांचा शासन निर्णय क्र.एसएफएस १०१७//प्र.क्र.८१०/एसएम-२ दिनांक २७ डिसेंबर २०१७
३) कार्यालय, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर यांचे पत्र क्र/माध्य/ग/स्वंयअर्थ/३५२३/२०१८ दिनांक ३२/०४/२०१८

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन संदर्भिय शासन निर्णय क्र.२ नुसार आपल्या संस्थेस शासनाने स्वंय अर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम,२०१२ अन्वये शैक्षणिक सत्र २०१७-१८ करीता नविन प्राथमिक शाळा / दर्जावाढ सुरु करण्यास परवानगी दिलेली असल्याचे कळविलेले आहे.

| अक्र | अर्जदार संस्थेचे नाव | मान्यता मिळालेल्या शाळेचे नाव व पत्ता | नविन शाळा दर्जावाढ | मंडळ संलग्नता | शाळेचा प्रकार | शाळेचे माध्यम | मान्यता वर्ष |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | पोदार लिटरसी अ‍ॅण्ड एज्युकेशन ट्रस्ट,मुंबई | पोदार इंटरनॅशनल स्कुल सर्वे नं.१०२/३ सावंगी ते नागपूर बायपास,नागठाणा स्क्वेअर,वर्धा | नविन शाळा | सी.बी.एस.ई | प्राथमिक ते उच्च माध्यमिक (इयत्ता १ ली ते १२ वी सर्व शाखा) | इंग्रजी | सन २०१७-१८ पासुन |

अटी व शर्ती.

१) सदर शाळेने बालकांचा मोफत व व सक्तीच्या शिक्षणाचा अधिकार,अधिनियम २००९ व या अंतर्गत केलेले व केले जाणारे सर्व नियमांची /तरतुदींची पुर्तता करणे आवश्यक आह

२) संबंधित शाळेच्या व्यवस्थापनाने अधिनियम,२००९ मधील तरतुदीची पुर्तता करुन सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षात शाळा सरु करण्यास खालील प्रमाणे परवानगी (इरादा पत्र) देण्यात येत आहे.

अ) व्यवस्थापनाकडे शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्य विहीत नियमानुसार आवश्यक असलेल्या सर्व बाबींची पुर्तता असल्यास शैक्षणिक वर्ष सरु झाल्यापासून एक महिन्याच्या आत प्रथम मान्यतेसाठी संबंधित जिल्हयाच्या शिक्षणाधिका-याकडे व्यवस्थापनाने अर्ज करावा.

ब) व्यवस्थापनास सन २०१७-१८ करीता या शासन निर्णयाव्दारे पात्र ठरविण्यात आले असल्यास शाळा स्थापन करण्यासाठी शासनाच्या विहीत नियमानूसार आवश्यक असलेल्या सर्व बाबी उपलब्ध नसतील तर त्यांना सदर बाबींची पूर्तता करण्यासाठी शासन निर्णयाच्या दिनांकापासुन अठरा महिन्याच्या आत शाळा सुरु करणे बंधनकारक राहील अन्यथा दिलेली परवानगी आपोआप अद्यबातल ठरेल.

ब) संबंधित शिक्षण संस्थानी खेळासाठीचे मैदान संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थासोबत (जिल्हा परिषद/महानगरपालीका/नगर परिषद/कक्क मंडळे इ.) सामंजस्य करार (MOU) करणे बंधनकारक राहील,संबंधित शिक्षणाधिकारी यांच्याकडे अशा करारपत्राची प्रत प्रथमत: आगाऊ स्वरुपात सादर केल्यानंतर शिक्षणाधिकारी यांच्याकडुन मान्यता देण्यात येईल.

क) शासन निर्णय दिनांक ३० जुन २०१२ मध्ये विहीत केलेल्या सर्वकष धोरणानुसार नाहरकत प्रमाणपत्र (NOC) मिळविण्यासाठी प्रथमत: शाळेस (Recognition) घेणे आवश्यक राहील.शाळेने अशी मान्यता (Recognition) सदर शासन निर्णयातील परिच्छेद (१०) नुसार जिल्हा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा शिक्षणाधिकारी (माध्यमिक) शिक्षण

a.c
२८/५/१८

निरिक्षक,बृहन्मुंबई यांचेकडून मिळाल्यानंतर मान्यता पत्रासह संस्था संबंधित मंडळाच्या सलग्नता ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी शासनास अर्ज सादर करेल.सदर अर्जाची छाननी सदर संबंधित शाळा विहित निकष,अटी व शर्तीची पूर्तता करीत असल्यास शासन शाळेस मंडळ सलग्नतेसाठी ना हरकत (NOC) प्रमाणपत्र देईल.

३. परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळेस शासनाच्या वेळोवेळी निर्ममीत होणा-या आदेशाचे व कार्यपध्दतीचे तसेच, शासनाच्या महाराष्ट्र स्वंयअर्थसहाय्यित शाळा (स्थापना व विनियमन) अधिनियम २०१२ (सन २०१३ चा ०१) मधील सर्व तरतुदीचे पालन करणे बंधनकारक राहील.

४. संबंधित सक्षम अधिका-यांनी अधिनिमयम,२००९ मधील तरतुदीची पुर्तता झाली असल्याची खात्री करावी व त्यानंतरच प्रथम मान्यता देण्याबाबतची पुढील कार्यवाही करावी.

५. संस्थेने शाळा परवानगीसाठी मागणी केलेले माध्यम शाळेचे ठिकाण इत्यादी मध्ये भविष्यात कोणताही बदल करता येणार नाही.शासनाने ज्या ठिकाणासाठी शाळा परवानगी दिलेली आहे.त्या ठिकाणा व्यतीरीक्त अन्य ठिकाणी शाळा सुरु केल्यास शासनाने दिलेली परवानगी आपोआप रद्य समजण्यात येईल.

६. यु डायस डाय या शासन निर्णयाव्दारे परवानगी देण्यात आलेल्या नविन शाळा /दर्जावाढ शाळा बाबत जिल्हानिहाय U-DISE (Unified District Information System For Education) मध्ये माहीती भरतांना,स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त शाळा म्हणुन स्वतंत्र प्रवर्गात नोंद करुन क्रमांक प्राप्त करुन घेण्याबाबतची जबाबदारी संबंधित संस्थेवर राहील.याबाबतची पुढील कार्यवाही करण्यासाठी राज्य प्रकल्प संचालक,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांना नोडल अधिकारी म्हणुन घोषित करण्यात येत आहे. त्याचप्रमाणे संस्थेने सर्व संबंधिताच्या माहितीकरीता स्वंयअर्थसहाय्यित तत्वावरील परवानगी प्राप्त नविन शाळा/दर्जावाढ परवानगी प्राप्त शाळा असा जाहीर फलक शाळेच्या बाहेर प्रवेशव्दारावर लावणे आवश्यक राहील.

७. परवानगी दिलेल्या स्वंयअर्थसहाय्यित शाळेमध्ये शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचा-यांची भरती शासनाच्या प्रचलित नियम व धोरणाप्रमाणे करावी.

शासनाचे सध्या अस्तित्वात असलेले प्रचलित नियम व शासन वेळोवेळी विहीत करेल अशा नियमांची अंमलबजावणी करणे आवश्यक राहील.

(व्ही.पी.कानवडे)
शिक्षणाधिकारी (प्राथमिक)
जिल्हा परिषद, वर्धा

प्रतिलिपी :-

१.मा.मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,वर्धा यांना माहितीस्तव सविनय सादर.
२.मा.शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग नागपूर, यांना माहितीस्तव सविनय सादर.